


# डॉ. ज्योतिष मित्र मिलिंद (पुणे)

## ज्योतिष अभ्यास, मार्गदर्शन आणि समुपदेशन

संपर्क : ७०५८११५९४७ वेब : www.jyotishmitramilind.in

विषय : दृष्टी विचार
संकलक : ज्योतिष मित्र मिलिंद
संदर्भ : एलेमेंत्स ऑफ अस्त्रोलोजी

नमस्कार,
आज आपण ज्योतिष शास्त्रातील दृष्टी या घटकाबाबत माहिती घेणार आहोत.
एखाद्या जन्म कुंडलीचे परीक्षण करताना अनेक गोष्टीचा साकल्याने विचार, विस्तृत रूपाने विश्लेषण आणि न्यायसंगत तर्क लावावा लागतो. त्यातील च ग्रह दर्शित दृष्टी हा एक त्यातील महत्वाचा घटक आहे.

प्रत्येक स्थानाचे काही निश्चित गोष्टी ठरलेल्या जाहेत. जर कोणत्याही स्थानी एखादा ग्रह स्थित असेल, तर तो त्या स्थान संबधित लाभ आठवा हानी प्रदान करू शकतो. हे त्या ग्रहाचा स्वभाव, ग्रहाच्या राशी, त्या स्थानाचा अधिपती द्वारे दर्शित गोष्टी ई. नुसार ठरत असते. तसेच त्यावर कोणत्या ग्रहाची दृष्टी पडत असते त्याच्या शक्ती व गुण अनुसार त्या फळामध्ये बदल घडवत असतो.

दृष्टि म्हणजे काय ?
दोन ग्रहाच्या प्रकाश किरणांनी पृथ्वीवर जो कोन निर्माण होतो त्यास दृष्टि म्हटले जाते. दृष्टि या शब्दाचा प्रयोग ज्योतिषशास्त्रामध्ये राशीचक्रातील कोणत्याही दोन बिंदुमधील कोनात्मक अंतर दर्शवण्यासाठी केला जातो. हे अंतर अंश व कलांमध्ये मोजले जाते.

हिंदू सिद्धांत :
प्राचीन हिंदू ज्योतीष आचार्यांच्या मते दृष्टिची मोजणी राशी ते राशी केली पाहिजे. ग्रह राशिच्या कोणत्या अंशांमध्ये आहे व दोन ग्रहाचे परस्पर कोनात्मक तर किती आहे, याचा विचार केला जात नव्हता.

उदा. एखादा ग्रह १ ले स्थानात मेष राशीत स्थित आहे. मग ती कितीही अंशावर असला ( १ ते ३० अंश च्या मध्ये) तरी समजा ७ वी दृष्टी मोजायची असेल तर मेष पासून ७ वी रास तुळ हिच्यावर म्हणजेच सप्तम स्थानावर दृष्टी ठेवेल.

अश्या प्रकारे दृष्टि सूर्य, चंद्र, मंगळ, गुरु, शनि, बुध व शुक्र सात ग्रहाची असते. (इतर ग्रह हिन्दू मोजणी मध्ये धरले जात नाहीत.)

सर्व ग्रहांना ७ वी दृष्टी पूर्ण मानली जाते.
सप्तम दृष्टिला सोडून ग्रह आपापल्या स्थानाहून ३ रे व १० वे स्थानाला एक चरण (नक्षत्राचा १/४ भाग)) ने देखिल पाहतात.
फक्त शनि ची ३ व १० वी दृष्टि पूर्ण असते.
गुरु ची ५ व ९ वी दृष्टि पूर्ण असते. ही दृष्टि गुरुच्या सप्तम दृष्टि पेक्षा जास्त बलवान असते.
मंगळ ची ४ व ८ वी दृष्टि पूर्ण असते. ही दृष्टि मंगळाच्या सप्तम दृष्टि पेक्षा जास्त बलवान असते.
'फलदीपक' मध्ये मंत्रेश्वर यांनी असे सांगितले आहे कि, फक्त सप्तम दृष्टि ही सर्व बाबतीत अधिक प्रभावशाली मानली पाहिजे, अन्य तितकी नाही. उत्तर कालामृत मध्ये १७ व्या श्लोकात स्कंध २८ मध्ये सांगितले आहे की, कोणताही ग्रह २, ६, १२ वे स्थानाला पाहत नाही व दोन ग्रहांची युती तेव्हाच मानायला हवी, जेव्हा १२ अंशाच्या आत असतील.

खादर ग्रहास किंवा स्थानावर दोन तीन ग्रह दृष्टी टाकत असतील. तर त्या सर्व दृष्ट्यांचा सारासार विचार करून निर्णय करावयास हवा. राशी ते राशी अंतर मोजण्याप्रक्षा अशावेळी अंशात्मक अंतराचा विचार केला तर निर्णय करणे जास्त सोपे जाईल.

हिन्दू दृष्टि ला राशिमध्ये संशोधन करून देते व ज्यावर त्याची दृष्टि पड़ते, त्या ग्रहाची विशेषता मध्ये देखिल बदल करते, ज्याच्यावर दृष्टि पड़ते, परिणाम शुभ किंवा अशुभ होतील, हे त्या स्थानावर पडणा-या ग्रहाच्या अधिपत्य वर निर्भर असते. शुभ स्थानाचे अधिपति शुभग्रह असताना, वाईट फळ नष्ट करतील व शुभ फळा मध्ये वाढ करतील व ६, ८, १२ वे स्थानाचे अधिपति असून पापग्रह असता, ज्या राशिना पाहतील त्यांना पीड़ा देतील व त्या राशिच्या शुभ फळांना नष्ट करतील.

पाश्चात्य दृष्टीयोग :
या पद्धतीमध्ये दृष्टी शुभ व अशुभ अशा दोन भागामध्ये विभागली जाते. या पद्धतीनुसार शुभ दृष्टी समान्ता व एक्ता उत्पन्न करणे ई. स्धुभ फळे निर्माण करते. पण अशुभ दृष्टि विरोद, असमानता ई. अशुभ फळ निर्माण करते.

माझ्या अभ्यासानुसार दोन शुभ ग्रह दृष्टी ठेवून जेव्हा सहयोग करतात व तो परिणाम उत्पन्न करितात, जो दशास्वामी व ग्रह दाखवतात. उदा. दशा स्वामी शुभ परिणामकारक असेल, तेव्हा ग्रह जे शुभ दृष्टी बनवतात, ते दशा स्वामी ला शुभ परिणाम देण्यामध्ये सहाय्यक ठरतील. पण जर विपरित दृष्टि असता, जर दश स्वामी शुभ फळ देणारा असेल, तर वाईट दृष्टी टाकणारा ग्रह त्या फळामध्ये विरोध करेल व अवांछित फळ देईल. हा ग्रह फक्त त्यावेळेस बाधा उत्पन्न करेल, जेव्हा त्या युतीचा काळ चालू असेल.

प्रमुख अंशात्मक दृष्टी येथे देत आहे.
शुभ दृष्टी :
१) Trine (त्रिकोण दृष्टी) : १२० अंशांतर
ही शुभ फळ देणारी दृष्टी बलवान असून सुखकर आहे.
२) Sextile (षटकोण दृष्टी) : ६० अंशांतर
ही शुभ फळ देणारी दृष्टी असून सुखकर आहे.
3) Semi sextile (अर्ध षटकोण दृष्टी) : ३० अंशांतर
चांगली, साधारण
4) Conjuction/Parallel (युती व समांतर दृष्टी) : ० अंशांतर
मिश्र फळ

अशुभ दृष्टी :
१) Opposition (विपरीत दृष्टी) : १८० अंशांतर
ही प्रभावी प्रतिकूल व तणाव सूचक दृष्टी आहे. ग्रह स्वाभाविक रूपाने पापग्रह असेल, तर आधिपत्य द्वारा वाईट असते.
2) Square (केंद्रीय दृष्टी) : ९० अंशांतर
अशुभ दृष्टी आहे.
3) Semi square (अर्ध केंद्रीय दृष्टी) : ४५ अंशांतर
अशुभ दृष्टी आहे, पण थोडी कमी वाईट आहे.
4) Sesqui Quadrate : १३५ अंशांतर
अशुभ दृष्टी आहे, पण थोडी कमी वाईट आहे.
5) Quincunx : १५० अंशांतर
अशुभ दृष्टी आहे.

थोडक्यात सांगायचे झाले तर :
२२.५ अंशाचे विभाजन होणारी अंशात्मक दृष्टी अशुभ असते.
उदा. २२.५, ४५, ६७.५, ९०, ११२.५, १३५, १५७.५, व १८० अंश या दृष्टी अशुभ आहेत.

१८ अंशाचे विभाजन होणारी अंशात्मक दृष्टी (९० अंश सोडून) व ३० अंशाचे विभाजन होणारी अंशात्मक दृष्टी (९० व १५० अंश सोडून) शुभ असते.
उदा. १८, ३०, ३६, ५४, ६०, ७२, १०८, १२०, १२६, १४४, व १६२ अंश या दृष्टी शुभ आहेत.

या सर्वांमध्ये ० अंशात्मक अंतर असलेली युती व समानंतर दृष्टी सर्वाधिक शक्तिशाली असते.

ज्योतिष मित्र मिलिंद

ज्योतिष मित्र मिलिंद